अतितात्काळ

क्र. पोमसं/३६/र.व का.(८३००)/टपाल /७९/२०२१
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.
दिनांक :-२७.१०.२०२१

विषय :- पोलीस कर्मचाऱ्यांना टपाल कर्तव्यार्थ असताना गणवेषाची सक्ती न करता त्यांचे ओळखपत्र तपासून, टपालाची देवाण-घेवाण करण्याबाबत...

****

परिपत्रक :-

टपाल घेऊन येणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या नियंत्रित करण्याबाबत या कार्यालयाच्या समक्रमांकित, दिनांक ०४.०५.२०२१ च्या परिपत्रकान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात टपाल घेऊन येण्याबाबत व टपाल घेऊन जाण्याबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यामध्ये कोठेही टपाल कर्तव्य करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांनी गणवेष परिधान करण्याबाबत उल्लेख नाही. तसेच या कार्यालयात टपाल घेऊन येणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र.व का.(८३००)/प्रवेश नियंत्रण/ ३६/२०२१, दिनांक ०७.०४.२०२१ च्या परिच्छेद ब (१) मध्ये नमूद परिशिष्ट (अ) मधील क (१) मध्ये विहित कार्यपद्धतीनुसार ओळखपत्राचे आधारे महाराष्ट्र पोलीस मुख्यालयाच्या इमारतीमध्ये प्रवेश देण्यात येतो व त्यानुसार ओळखपत्र तपासूनच त्यांच्याकडून टपाल स्विकारण्यात येते किंवा त्यांचेकडे टपाल पाठविण्यात येते. तथापि, काही पोलीस घटक कार्यालयांच्या नोंदणी शाखेतील कर्मचारी हे ज्यावेळी अन्य पोलीस घटक कार्यालयांतून पोलीस कर्मचारी टपाल घेऊन त्यांचेकडे जातात, त्यावेळी त्यांना "गणवेष परिधान करूनच या, नाही तर टपाल स्विकारण्यात येणार नाही", अशी सक्ती करण्यात येते असे निदर्शनास आले आहे.

वास्तविक बऱ्याच कर्मचाऱ्यांची तातडीच्या टपाल कर्तव्यासाठी नेमणूक करण्यात येत असल्याने त्यांचेकडे अगदी कमी तासांच्या अवधीमुळे बरेचदा रेल्वे/ एसटीमध्ये आरक्षण देखील नसते. त्यामुळे प्रवासात टपालाची बॅग सांभाळणे ही त्यांची महत्वाची जबाबदारी असते. गणवेष परिधान करून संपूर्ण प्रवास करणे देखील सोयीस्कर नसते. रात्रीच्या प्रवासात चुरगळलेला, मलीन झालेला गणवेष परिधान करणे उचित नाही. तसेच प्रवासात टपालाच्या बॅगसोबत गणवेषाची पिशवी /बॅग सांभाळणे अडचणीचे होते. त्यामुळे केवळ टपालाची देवाण-घेवाण करण्यासाठी पोलीस टपाल कर्मचाऱ्यांना गणवेष परिधान करण्याची सक्ती करणे व्यावहारिक नाही.

कार्यक्षेत्र / कार्यकारी कर्तव्यासाठी किंवा कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कर्तव्यासाठी पोलीसांना गणवेष विहित करण्यात आलेला आहे. कार्यालयीन टपालाची ने-आण करणे हा कार्यक्षेत्र/ कार्यकारी कर्तव्याचा भाग होत नाही. त्यामुळे अकार्यकारी दलातील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना जसे गणवेष परिधान करण्यापासून वगळण्यात आले आहे त्याच धर्तीवर टपाल कर्तव्य करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेष परिधान करण्यापासून वगळण्यात येत आहे.

यास्तव ज्यावेळी जिल्ह्याचे किंवा आयुक्तालयाचे टपाल कर्तव्य करणारे पोलीस कर्मचारी दुसऱ्या जिल्ह्यात किंवा आयुक्तालयात टपाल घेऊन जातात, त्यावेळी त्यांना "गणवेष परिधान करण्यास सांगण्यात येवू/ये, तर त्यांचे ओळखपत्र तपासून, टपालाची देवाण-घेवाण करण्यात यावी".

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था/ आस्थापना/ प्रशासन/ नियोजन व समन्वय/ विशेष कृती दल/ राज्य राखीव पोलीस बल/ वाहतूक/ लोहमार्ग/ प्रशिक्षण व खास पथके/फोर्स वन/दहशतवाद विरोधी पथक/ आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक व अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, (कायदा व सुव्यवस्था/ आस्थापना/प्रशासन/ नागरी हक्क संरक्षण/महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र (कॅम्प नागपूर)
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्गसह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन/ धोरण/ नि. व स.)
सरसंपादक, दक्षता तथा सहायक पोलीस महानिरीक्षक (धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष,महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, का.क्र. १ ते ४४

प्रत माहितीसाठी,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक